परिसर

Parisar Sanrakshan
Sanwardhan Sanstha
परिसर संरक्षण
संवर्धन संस्था

Parisar
'Yamuna', I.C.S. Colony,
Ganeshkhind Road,
Pune 411 007
Tel.: (020) 29701004

परिसर
'यमुना', आय.सी.एस.कॉलनी,
गणेशखिंड रोड,
पुणे ४११ ००७
दूरध्वनी : (०२०) २९७०१००४

Email: info@parisar.org
Web.: www.parisar.org

१ सप्टेंबर २०२१

डॉ. विकास महात्मे,
खासदार राज्यसभा,
पद्मश्री पुरस्कृत नेत्रतज्ञ,
नागपुर, महाराष्ट्र

**संदर्भ - नवीन मोटार अधिनियम (सुधारित) कायदा महाराष्ट्रात लागू करणेबाबत परिवहन मंत्री मा. अनिल परब यांस पाठविलेले पत्र दि. ११/८/२०२१**

**विषय - धन्यवाद पत्र**

वरील संदर्भ अनुसरून, आपण परिवहन मंत्री मा. अनिल परब यांस पाठवलेले पत्र मिळाले. आम्हास वाचून खूप आनंद झाला. आपणास "परिसर" तर्फे मनापासून शतशः धन्यवाद.

आपला सामाजिक कार्यातील सिंहाचा वाटा सर्वश्रुत आहे. रस्ते सुरक्षा या समस्येवर करीत असलेले कार्य देखील उल्लेखनीय आहे. आम्हास लिहिण्यास आनंद होतो की आपण आमच्या निवेदन पत्राची दखल घेऊन केंद्रीय मोटार वाहन (सुधारित) अधिनियम २०१९ च्या तरतुदी महाराष्ट्रात लागू करणेबाबत महाराष्ट्राचे परिवहन मंत्री यांस केलेली मागणी स्तुतीपात्र आहे. आपल्यासारख्या लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्तपणे या मोहिमेस दिलेला पाठिंबा याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत.

आम्ही आपणास कळवू इच्छितो की सदर विषयासंबंधी आम्ही भारतीय जनता पक्षातील इतर सदस्यांसोबत पत्रव्यवहार केलेला आहे. आम्ही आपणास विनंती करतो की या विषयासंबंधी आपण पक्षांतर्गत हा मुद्दा उचलून धरावा आणि आणि विरोधी पक्षनेते या भूमिकेतून ठोस पावले उचलावी.

आम्ही आशा करतो की, आपण ज्याप्रमाणे आमच्या निवेदन पत्राची दखल घेऊन माननीय परिवहन मंत्री यांना आवाहन केले, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील इतर विरोधी पक्ष नेते या मोहिमेसाठी आम्हाला पाठिंबा देतील.

मनःपूर्वक पुनश्च धन्यवाद,

आपला विश्वासू,

संदीप गायकवाड,
वरिष्ठ प्रकल्प सहाय्यक,
परिसर, पुणे.
☎ 97028 30546/020-29701004 ✉ sandeep@parisar.org

Cc:
श्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री चंद्रकांत दादा पाटील, अध्यक्ष भारतीय जनता पार्टी तथा आमदार कोथरूड मतदार संघ पुणे.

Registered Under Societies Registration Act 1860 - No. MAH/3478/87/Pune 13 October 1987
Registered Under Bombay Public Trust Act 1950 - No. F-4598 2 December 1987